**नियमित फौजदारी खटला क्रं. १७५/२००६.**
**नि.क्रं. २५३**

## : न्या य नि र्ण य :

( दिनांक ०९ डिसेंबर २०२३ रोजी घोषित )

१. प्रस्तुतची फिर्याद निरीक्षक श्री. एम. एल. यादव, दिवा आरपीएफ यांनी आरोपी क्र. १५ मक्की हसन आजम तुल्ला खान यांचे विरुद्ध रेल्वे संपत्ती बेकायदेशीरपणे बाळगणे कलम ३(अ) प्रमाणे दाखल केलेली आहे. आरोपीने न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहून गुन्हा कबुलीचा अर्ज नि. २५० वर दिला आहे. त्याप्रमाणे मी नि. २५१ कडे त्यांच्याविरुद्ध दोषारोप ठेवला. त्यातील मजकूर त्याला त्याचे मातृभाषेत समजावून सांगितला असता त्याने गुन्हा कबुल करुन तसे निवेदन नि. २५२ कडे दिले. सरकारी वकील तसेच आरोपीचे शिक्षेबाबत म्हणणे ऐकले.

२. आरोपीने रेल्वे संपत्ती बेकायदेशीरपणे बाळगल्याने त्यांना अपराधी परिविक्षा अधिनियमाखालील तरतूदींचा लाभ देणे उचित होणार नाही. तसेच, चोरीचे रेल्वे मालमत्तेचे मुल्य रू. १००,०००/— आहे. चोरी केलेली मालमत्ता जप्त करण्यात आलेली आहे. तसेच, सदरचा गुन्हा हा त्यांचा पहिला गुन्हा असल्याचे व संपुर्ण कुटुंबाची त्यांच्यावर जबाबदारी असल्याचे त्याने कथन केले असल्याने, त्याला रेल्वे संपत्ती बेकायदेशीर बाळगणे कलम ३(अ) साठी रू. २५,०००/— दंड, दंड न भरल्यास १ महिना साध्या तुरूंगवासाची शिक्षा पुरेसी असेल. :

## आ दे श

१. आरोपी क्र. १ मक्की हसन आजम तुल्ला खान यांना रेल्वे मालमत्ता बेकायदेशीरपणे बाळगणे कलम ३(अ) प्रमाणे दोषी ठरविण्यात येते.

२. आरोपीला रेल्वे मालमत्ता बेकायदेशीरपणे बाळगणे कलम ३(अ) साठी रू. २५,०००/— दंडाची शिक्षा व दंड न भरल्यास १ महिना साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे.

३. निकालपत्राची छायांकित प्रत विनामुल्य त्वरीत आरोपीला देण्यात यावी.

४. खटला आरापी क्र. १ ते ७, ९, १२, व १६ यांचेवर प्रलंबिल असल्याने जप्त मुद्देमालबाबत आदेश नाही.

५. आरोपीने भरलेल्या दंडाची संपूर्ण रक्कम रेल्वे प्रशासनाला नुकसान भरपाई म्हणून देण्यात यावी.

**कल्याण.**

**दिनांक :— ०९.१२.२०२३.**

**स्वयंम शै. चोपडा**
**न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग,**
**लोहमार्ग न्यायालय, कल्याण.**